**पंतप्रधानांनी इथिओपियाच्या पंतप्रधानांशी द्विपक्षीय चर्चा केली (डिसेंबर 16, 2025)**

16 डिसेंबर 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज ॲडिस अबाबा येथील नॅशनल पॅलेसमध्ये इथिओपियाचे पंतप्रधान माननीय डॉ. अबीय अहमद यांची भेट घेतली.पॅलेसमध्ये आगमन झाल्यानंतर पंतप्रधान डॉ. अबीय अहमद यांनी पंतप्रधान मोदी यांचे हार्दिक स्वागत केले आणि औपचारिक स्वागत समारंभ आयोजित केला.

2. दोन्ही नेत्यांची मर्यादित व शिष्टमंडळ स्तरीय स्वरूपाची बैठक झाली. अनेक शतकांच्या सभ्यता कालीन संबंधांवर आधारलेल्या व लोक संबंधांमुळे दृढ झालेल्या आमच्या द्विपक्षीय संबंधांवर त्यांनी चर्चा केली. संबंधाचे महत्त्व लक्षात घेता, भारत-इथिओपिया संबंध धोरणात्मक भागीदारीच्या स्तरावर नेण्यावर दोन्ही नेत्यांनी सहमती दर्शविली. जागतिक दक्षिणेचे भागीदार म्हणून , उभय देशांनी सर्वसमावेशक जगाच्या बांधणीसाठी योगदान देत राहिले पाहिजे असे त्यांनी नमूद केले. 2023 मध्ये भारताकडे अध्यक्षपद असताना आफ्रिकन युनियनचे G20 सदस्य म्हणून स्वागत करणे हा आमचा विशेष सन्मान होता असे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केले. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर एकता दाखवल्याबद्दल आणि दहशतवादाविरोधातील जागतिक लढा बळकट केल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी इथिओपियाचे आभार मानले.

3. दोन्ही नेत्यांनी व्यापार व गुंतवणूक, नवोपक्रम व तंत्रज्ञान, शिक्षण व क्षमता विकास, आणि संरक्षण सहकार्य या क्षेत्रांसह भारत व इथिओपिया यांच्यामधील बहुआयामी भागीदारीच्या प्रगतीचा आढावा घेतला. आरोग्य सुरक्षा, डिजिटल आरोग्य, पारंपरिक औषधे, जन औषधी केंद्र, अन्न सुरक्षा, शाश्वत कृषी, नैसर्गिक शेती, व कृषी-तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये इथिओपिया सोबत सहयोग करण्याच्या भारताची' इच्छा पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केली. दोन्ही देशांमधील वाढती विकासात्मक भागीदारीमुळे मजबूत लोक-संबंध अधिक दृढ होतील असे नेत्यांनी अधोरेखित केले.

4. दोन्ही नेत्यांनी उभय देशांमधील आर्थिक भागीदारीचा आढावा घेतला. डिजिटल सार्वजनिक साधन सुविधा, खाणकाम, महत्त्वाची खनिजे व स्वच्छ ऊर्जा या क्षेत्रांमधील सहकार्यावर त्यांनी चर्चा केली. पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारतीय कंपन्यांनी विश्वासू भागीदार म्हणून इथिओपियाच्या अर्थव्यवस्थेमध्ये, विशेषत: उत्पादन  व फार्मास्युटिकल्स या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये 5 दशलक्ष डॉलर्स पेक्षाही अधिक गुंतवणूक केली आहे, ज्यामुळे 75,000 पेक्षाही अधिक स्थानिक नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत.

5. जागतिक दक्षिणेच्या समस्या मांडण्यासाठी एकत्र काम करण्याच्या वचनबद्धतेचा दोन्ही पंतप्रधानांनी पुनरुच्चार केला. संयुक्त राष्ट्रांसह विविध क्षेत्रांमधील सहकार्यावर त्यांनी चर्चा केली. हवामान बदल, नवीकरणीय ऊर्जा व आपत्ती जोखीम शमन यासारख्या मुद्यांवर अधिक सहकार्यावर त्यांनी चर्चा केली आणि याबाबतीत इंटरनॅशनल बिग कॅट अलायन्स (IBCA), संयुक्त आपत्ती लवचिक साधन सुविधा, जागतिक जैवइंधन आघाडी आणि आंतरराष्ट्रीय सौर आघाडी यासारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांच्या भूमिकेचे स्वागत केले. पंतप्रधान मोदी यांनी ब्रिक्स भागीदार म्हणून त्यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रस्तावित भारत-आफ्रिका फोरम परिषदेसाठी इथिओपिया सोबत काम करण्याची इच्छा व्यक्त केली.

6. चर्चेनंतर, दोन्ही नेत्यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतता कार्य प्रशिक्षण; सीमाशुल्क बाबींमध्ये परस्पर प्रशासकीय साहाय्य आणि इथिओपियाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयामध्ये डाटा सेंटर स्थापन करणे या क्षेत्रांमध्ये तीन सामंजस्य करार केले.

7. पंतप्रधान डॉ. अबीय यांनी पंतप्रधान मोदी यांच्या सन्मानार्थ स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. पंतप्रधान मोदी यांनी पंतप्रधान डॉ. अबीय यांना भारत भेटीचे निमंत्रण दिले असून, ते त्यांनी स्वीकारले आहे.

ॲडिस अबाबा

16 डिसेंबर 2025